
Historicity Research Journal
ISSN : 2393-8900

Impact Factor : 0.4521 (UIF)
Volume - 2 | Issue - 12 | August - 2016

# सिंधू संस्कृतीतील कृषि व्यवस्था व आर्थिक जीवन

प्रा. रेवणसिद्ध रामभाऊ बेरुणगीकर
सहा.प्राध्यापक, दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.



## प्रस्तावना

नवाश्म युगामध्ये कृषि व्यवस्थेचा जन्म झाला आणि कालांतराने मानवाच्या बुद्धी कौशल्यामुळे हडप्पा कालखंडापर्यंत त्याचा अधिक विकास झाला. इ.स.पूर्व ९००० मध्ये जगामध्ये नवाश्म युगाची सुरुवात झाली. नवाश्म युगामध्ये शेतीचा प्रारंभ महत्वाची क्रांती मानली जाते. येथेच मानवाने बदलत्या वातावरणाशी संघर्ष करण्याची आपली कला विकसित केली व मानव शेती करु लागला व स्थिर जीवन जगू लागला. भारतीय उपखंडात इ.स.पूर्व ७००० च्या सुमारास नवाश्म युगाची सुरुवात झाली असे मानण्यात येते. बलुचिस्तानमधील मेहरगढ हे ठिकाण नवपाषाणयुगीन अनेक स्थळांपैकी महत्वाचे स्थळ होते. येथील लोक अधिक प्रगत होते. येथेच प्रथमत: भारतीय उपखंडात शेती व्यवस्थेचा प्रारंभ झाला. ते गहू व कापुस, बार्ली याचे उत्पादन घेत होते.सिंधू संस्कृती ही नवपाषाण आणि ताम्रपाषाण संस्कृतीपेक्षा अधिक विकसित अशी संस्कृती होती. या संस्कृतीने पंजाब, हरियाणा, सिंध, बलुचिस्तान, गुजरात, राजस्थान आणि उत्तर प्रदेशचा भाग व्यापलेला होता. उत्तरेकडे जम्मू पासून दक्षिणेला नर्मदापर्यंत, पश्चिमेला मकरानच्या तटापासून ते पूर्वेला मेरठपर्यंत या संस्कृतीचा विस्तार झालेला होता. इजिप्त व मेसोपेटीया येथील संस्कृतीपेक्षा हडप्पा संस्कृती अधिक नियोजनबद्ध, विकसित व क्षेत्रफळाने मोठे होते. त्यामुळे याला भारतीय उपखंडातील पहिले नागरिकरण असेही म्हटले जाते.

मोहेनजोदडो, हडप्पा, कालिबंगण, लोथल येथे आढळलेल्या धान्यांच्या कोठारावरुन या काळातील कृषि व्यवस्थेचा व त्यामध्ये होणाऱ्या उत्पादनांचा आपल्याला कल्पना करता येते. नील नदीने जशी इजिप्त संस्कृतीचे निर्माण केले त्याचप्रकारे सिंधू नदीने सिंधू संस्कृतीचा विकास केला. सिंधू नदी नील नदीपेक्षाही मोठ्या प्रमाणात सुपीक गाळ वाहून आणत असे. त्यामुळे प्राचीन काळी सिंधूच्या खोऱ्यातील प्रदेश अधिक सुपिक होता. या प्रदेशात नैसर्गिक वनस्पतीचे आच्छादन खूप मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे पर्जन्यमान अधिक होते. सिंधू संस्कृतीतील लोकांनीच मिश्र शेतीचा प्रारंभ केला. येथील लोकांनीच एकाच वेळेस अनेक पीकांचे उत्पादन घेण्याची कला विकसित केली. येथे आढळलेल्या बैलगाडी आजपर्यंत त्याच पद्धतीने वापरली जात आहेत.वीटा भाजण्यासाठी, बांधकामासाठी लागणारे लाकडे जंगलातून मिळत असत. शेतीचे ज्ञान प्राप्त झाल्याने मानव समुदाय नदीकाठच्या मैदानाकडे आकर्षित झाला. सिंधू नदीबरोबर वाहत येणाऱ्या गाळामुळे हा प्रदेश सुपिक बनलेला होता. प्रत्येक वर्षी येथे नवीन गाळ जमा होत असे. त्यामुळे साहजिकच मानव समुदाय या ठिकाणी आकर्षित होऊन वस्ती करुन राहू लागला.

## कृषि व्यवस्था :

कृषि अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये सिंधू संस्कृतीची महत्वपूर्ण भूमिका होती. दोन पीकांची शेती, नांगरचा प्रयोग इत्यादी गोष्टी जगात प्रथमत: सिंधू संस्कृतीमध्येच आढळतात.

सिंधू प्रदेशातील लोक पूराचे पाणी ओसरल्यानंतर नोव्हेंबरमध्ये नदीकाठी बी पेरत आणि एप्रिलमध्ये पुन्हा पूर येण्याच्या आधी ते पीके कापून घेत असत. येथे प्रामुख्याने गहू व बार्ली चे उत्पादन घेतले जात असे. हडप्पामध्ये तीळ, वटाणे याची शेती केली जात होती. लोथल आणि रंगपूर येथे बाजरीचे उत्पादन घेतले जात होते. पीकांच्या कापणीसाठी दगडी कोयत्यांचा वापर केला जात असे. काही ठिकाणी शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी जमीनीखालून पाण्याचे कालवे काढलेले होते तर काही ठिकाणी पूराचे अतिरिक्त पाणी वाहून नेण्यासाठी नाले देखील बांधले गेलेले होते. लोथल येथे सापडलेल्या तांदळाच्या अवशेषावरुन इ.स.पूर्व १८ व्या शतकात येथे तांदळाचे पीक घेतले जात होते असे दिसते. सिंधू खोऱ्यातील लोकांनीच सर्वप्रथम कापसाचे उत्पादन घेतले. फळामध्ये केळी, नारळ, खजूर, डाळींब, लिंबू, टरबूज इत्यादींचे उत्पादन घेतले जात होते. शेतीला नांगरण्यासाठी बहुधा ते दगडी अवजारांचा वापर करीत. मोहेनजोदडो आणि बनावली येथे मातीपासून बनविलेले नांगर प्राप्त झाले आहेत. त्यामुळे त्या काळामध्ये शेतीसाठी नांगर वापरले जात असावेत आणि ते बहुधा लाकडी असावेत असा देखील अनुमान काढला जातो. राजस्थानमधील कालीबंगन येथे उत्खननात नांगरलेली जमीन आढळलेली आहे.

येथील अन्नधान्याचे उत्पादन खेड्यातील लोकांपुरतेच मर्यादित नव्हते तर ते शहरातील लोकांनाही पुरविले जात होते. शहरातील लोकांचा धान्य उत्पादनाशी प्रत्यक्ष संबंध येत नसे. खेड्यातील अतिरिक्त धान्य शेतसारा म्हणून घेतला जात असे व ते मोहेनजोदडो, हडप्पा, कालीबंगन, लोथल या ठिकाणच्या प्रचंड कोठारात साठविले जात असे. या धान्यांचा वापर बहुधा मजूरांचे वेतन देण्यासाठी तसेच नैसर्गिक आपत्तीचे वेळी किंवा गरजेच्या वेळी धान्याचा तुटवडा झाल्यास केला जात असे.

## पशुपालन :

कृषि बरोबरच सिंधू संस्कृतीत पशुपालनाचा देखील विकास झालेला दिसतो. ते बैल, म्हैस, शेळ्या-मेंढ्या इ. प्राणी पाळत असत. कुत्रा व मांजर या प्राण्यांचे देखील ठसे सापडलेले आहेत. उंट व गाढव यांसारख्या प्राण्यांचा वापर व्यापारासाठी, ओझे वाहून नेण्यासाठी केला जात असे.त्यांना हत्तीचे देखील ज्ञान होते. येथे मोठ्या प्रमाणात हस्तीदंताच्या वस्तू सापडलेल्या आहेत. सिंधू संस्कृतीमध्ये कांही प्राण्यांचा वापर मांस खाण्यासाठी केला जात असे तर काही प्राण्यांना धार्मिक महत्व होते. सिंधू संस्कृतीमध्ये वळूला खूप महत्वाचे स्थान होते. सूरकोतदा येथे घोड्यांची हाडे मिळाली आहेत. तसेच लोथल आणि रंगपूर येथे घोड्यांच्या हाडापासून बनविलेले मूर्ती मिळालेल्या आहेत. असे असले तरी सिंधू संस्कृतीत घोड्यांचा वापर मोठ्या प्रमाणात झाल्याचा कोणताही स्पष्ट पुरावा सापडत नाही.

## व्यापार :

नागरीकरणासाठी कृषिमधील अधिशेष, व्यापार आणि वाणिज्य या गोष्टी महत्वाच्या असतात. सिंधू संस्कृतीतील नागरीकरणासाठी निश्चितच व्यापाराची भूमिका महत्वाची ठरते.

सिंधू कालखंडातील समुदाय नवाश्म युगापासून चालत आलेली कृषिकर्म तर करीतच होते. परंतु त्यांनी त्याही पुढे जाऊन व्यापार व्यवस्थेमध्ये भाग घेतला. त्या प्रदेशात सापडलेल्या मुद्रा, प्रमाणित वजनमापे, समानलिपी यावरुन ते सिद्ध होते. या काळात व्यापार आणि वाणिज्य याच्या विकासासाठी प्रेरित करणारे दोन कारणे महत्वपूर्ण होती. पहिले - सिंधू संस्कृतीतील श्रमिकांना कच्च्या मालाची आवश्यकता होती जी स्थानीय स्तरावर उपलब्ध नव्हती. दुसरे - येथील श्रीमंत वर्गातील लोकांना सुखसोईच्या वस्तुंची आवश्यकता होती. हे दोन्ही व्यापाराच्या माध्यमातूनच मिळविता येणारे होते. व्यापारी गतिविधीमध्ये झालेली गुणात्मक वृद्धी हडप्पा संस्कृतीचे प्रमुख वैशिष्टय होते. सिंधू संस्कृतीतील लोकांनी अनेक प्रकारच्या उद्योगांचा विकास केला. येथील उत्खननामध्ये तकली आणि सुई प्राप्त झाले आहेत. त्यावरुन येथे कापड विणण्याचा प्रमुख उद्योग होता असे दिसते. या ठिकाणी चांदीच्या भांड्यात ठेवलेले कापड आणि बऱ्याच वस्तुंमध्ये कापडाचे धागे सापडलेले आहेत. यावरुन येथील कापड उद्योग किती प्रगत होता याचा अनुमान काढता येतो.

मातीची भांडी बनविण्याचा उद्योग विकसित अवस्थेमध्ये होता. ही भांडी प्रामुख्याने चाकावरती बनविलेले असत. ते व्यवस्थितपणे भाजलेली असत. त्यावर पक्षी, प्राणी, वनस्पती यांचे चित्रे कोरलेली होती. त्याचबरोबर मातीची खेळणी देखील बनविली जात होती.आधुनिक काळात बनविले जात असलेले मातीच्या मूर्तीप्रमाणेच येथील मूर्ती घडविले जात होते. येथील पशूंची मूर्ती महत्वपूर्ण होती. याच मूर्तीने संभवत: अशोकच्या काळातील अभिलेखामध्ये कोरल्या गेलेल्या पशू मुर्तीसाठी प्रेरणास्रोत बनले. येथे दागिने बनविण्याचा उद्योग देखील विकसित अवस्थेत होता. सोने-चांदी, पितळ, तांबा, कांस्य यांपासून विविध प्रकारचे दागिने बनविले जात होती. या काळातील अलंकार उत्कृष्ट प्रतीच्या मण्यांपासून देखील बनविले जात होते. येथील गोमेद, लाल रंगाचे दगड, शेलखडी, पाचू यांचा वापर करुन अलंकार बनविले जात असत. लोथल आणि चान्हुदडो येथे मण्यांचे कारखाने मिळालेले आहेत. हस्तीदंत, शंख, शिप यांपासून देखील विविध वस्तू तयार केली जात होती. लोथल येथील उत्खननातून एक दिशादर्शक यंत्र सापडलेले आहे जे शंखापासून बनविलेले होते. मोहेनजोदडे आणि लोथल येथे हस्तीदंतापासून तयार केलेले तराजू सापडलेले आहेत. सिंधू संस्कृतीत मोठ्या प्रमाणात मुद्रा व शिक्के सापडलेले आहेत. ते प्रामुख्याने माती आणि दगडांपासून बनविलेले होते. त्याच्यावर लेख, प्राण्यांची आकृती आणि चिन्हे कोरलेली दिसतात. त्याचा वापर वस्तुंना सिलबंद करण्यासाठी व मंदीरामध्ये देणगी देण्यासाठी केला जात असे.

सिंधू कालखंडातील व्यापारी लोक देशांतर्गत व देशाबाहेर विदेशी लोकांशी व्यापार करीत होते. अंतर्गत व्यापारामध्ये कर्नाटक, राजस्थान, बलुचिस्तान इत्यादी क्षेत्र महत्वाचे होते. त्याचबरोबर विदेशी व्यापारामध्ये मेसोपोटामिया, पर्शियाचा आखात, अफगाणीस्तान, मध्य आशिया इ. क्षेत्र महत्वाचे होते. या काळात सिंधू संस्कृतीतील लोक विभिन्न वस्तूंचे आयात देखील करीत होते. उदा. कर्नाटक येथून सोने मेसोपोटामिया आणि अफगाणीस्तानमधून चांदी, राजस्थान मधून तांबे, इराण आणि अफगाणीस्तानमधून कांस्य धातु त्याचबरोबर अफगाणीस्तानमधून सोने, लाजवर्दमनी मध्य एशियामधून आयात केले जात होते. या बदल्यात सिंधू संस्कृतीतील लोक कित्येक वस्तूंचे निर्यात देखील करीत असत. लोथलमधून शंख आणि हस्तीदंतापासून बनविलेले वस्तू निर्यात केली जात होती. या व्यतिरिक्त सोने, चांदी आणि तांबे यांच्यापासून बनविलेले वस्तू, इमारतीसाठी बनविलेली लाकडे, कापूस व अन्नधान्यांचे देखील निर्यात केली जात असे. येथील लोकांनीच भारतीय उपखंडात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा पाया रचला. त्यांनी मातीच्या भांड्यांच्या निर्मितीसाठी चाकाचा उपयोग केला. जे पुढे बैलगाडी बनविण्यासाठी उपयोगास आली. त्यांनी अफगाणीस्तानमध्ये व्यापारी वसाहत वसविले होते. तेथून ते टायग्रस, युफ्रेटीस या नद्यांच्या काठावरील प्रदेशांशी व्यापार करीत. तसेच ते समुद्र मार्गाने पर्शियन आखातमधील बहरीन, पश्चिम आशियामधील मेसोपोटेमिया येथील लोकांशी व्यापार करीत. त्यामुळे येथील समुदायाने जगामध्ये प्रथमत: वैश्विक व्यापाराचा पाया रचला असे म्हणण्यास हरकत नाही. वैश्विक व्यापाराची बीजे खऱ्या अर्थाने सिंधू संस्कृतीमध्ये आढळतात.

## निष्कर्ष :

सिंधू कालखंडातील कृषि व्यवस्था अधिक विकसित झाल्याचे दिसून येते. सिंधू संस्कृतीतील समाजाचा अभ्यास केल्यानंतर येथील समाज रचना किती गुंतागुंतीची होती याची आपल्याला कल्पना येते. येथे विभिन्न सामाजिक समूहातील लोकांची उपस्थिती होती. येथे विविध प्रकारचे आर्थिक, राजनैतिक, सामाजिक व संस्कृतिक रचना दिसतात. यामुळे या कार्यांशी जोडल्या गेलेल्या लोकांचे समूह देखील वेगवेगळे होते. येथे कुलीन वर्ग, शासक वर्ग, श्रमिक वर्ग आणि व्यापार वर्ग यांचा समूह दिसुन येतो. येथील कुलीन वर्ग कृषिमध्ये शेष उत्पादनाचा मोठ्या प्रमाणात उपभोग घेत होता असे दिसते. येथील अंतर्गत व विदेशी व्यापार पाहता व्यापारी वर्गांची उपस्थिती किती मोठ्या प्रमाणात होती हे दिसुन येते. येथे झालेल्या लेखन कलेचा विकास येथे शिक्षित वर्ग आणि लिपीक वर्ग उपस्थित होता हे दर्शविते. येथील लोकांनी शेती व पशुपालन यांच्या उत्पादनाच्या जोरावर खूप प्रगती केली. त्यांनी नियोजनबद्ध नगरांची स्थापना केली. मोहेनजोदडो, हडप्पा, कालीबंगन, लोथल, चन्दुदारो, धोलवीरा, बनावली, राखीगडी अशा अनेक विशाल नगरांची स्थापना येथील लोकांनी केली. या सर्व नगरांची निर्मिती करण्यासाठी कुशल कारागीरांचा वापर केला गेला. या सर्वांचे भरण-पोषण करणे विकसित कृषिव्यवस्था आणि समृद्ध व्यापारा शिवाय शक्य नव्हते. वर्तमान काळातील हिंदू धर्म मोठ्या प्रमाणात सिंधू संस्कृतीतील उपासना पद्धतीवर अवलंबून असल्याचे दिसून येते. येथील मातृदेवीची उपासना, वृक्षपूजा, अग्निपूजा, जलपूजा इत्यादी हिंदू धर्माला सिंधू संस्कृतीची देणगी आहे.

अशा प्रकारे पुरापाषाण काळातील आदिमानवाने नवाश्म युगामध्ये स्थिर कृषि व्यवस्थेचा प्रारंभ केला व ते पुढे हडप्पा काळापर्यंत खूप विकसित झाली व वैश्विक व्यापारास चालना मिळाली, जी आजतागायत सुरु आहे.

## संदर्भग्रंथ सूची :

१) प्राचीन भारत का इतिहास - झा और श्रीमाली

२) प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती - के.सी.श्रीवास्तव
३) प्राचीन भारत - आर.एस.शर्मा
४) The wonder that was India - A.L. Basham
५) Ancient India - Publication Division
६) Early India - Romila Thapar
७) प्राचीन भारत का सामाजिक और आर्थिक इतिहास - ओमप्रकाश
८) An advanced history of India - Mujumdar
९) Ancient India an Introductory Outline - D.N. Jha
१०) Political history of ancient India - H.C. Ray-Choudhari